# मुंबई विद्यापीठ

परिपत्रकः-

विशेष कक्ष/माइआ(७५)/२००५/ २८२
दिनांक ११ जुलै,२००५

संचालक/ विद्यापीठाचे विभाग प्रमुख प्राचार्य ज.जी वास्तुशास्त्र महाविद्यालय अधिष्ठाता संचालक, मान्यता प्राप्त पदव्युत्तर संस्था आणि प्राचार्य-सर्व संलग्नित कला, वाणिज्य आणि विज्ञान, विधी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र, फाईन आर्टस महाविद्यालये/संस्था याना परिपत्रक क्रमांक Spl Cell २०५/२००५ दिनांक १० मे,२००२ अन्वये कळविण्यात आले होते की, महाराष्ट्र राज्य मानवी अधिकार आयोग यांनी २९ एप्रिल, २००२ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू असलेल्या शिष्यवृत्ती/फ्री शीपची अंमलबजावणी योग्य प्रकारे करुन सदर योजनेची माहिती सर्व महाविद्यालयांनी/संस्थांनी शैक्षणिक वर्ष २००२-०३ पासून त्यांच्या प्रवेश पुस्तिकेत/माहिती पुस्तिकेत छापावी अथवा समाविष्ट करावी.

याबाबत परिपत्रक क्रमांक विशेष कक्ष/ मासशि (२८)/३०५/२००३ दिनांक ८ जुलै,२००३ अन्वये पुन्हा याबाबत अमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

बहुजन विद्यार्थी परिषदेने माहितीच्या अधिकारातंर्गत महाराष्ट्र राज्य मानवी अधिकार आयोग यांनी दिनांक २९ एप्रिल,२००२ रोजी दिलेल्या आदेशानुसार कोणकोणत्या महाविद्यालयांनी/संस्थांनी या प्रकारे अमलबजावणी केलेली आहे त्याची माहिती मागितलेली आहे.

मा. कुलगुरुंच्या आदेशानुसार पुन्हा सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, माहिती पुस्तिकेत मागासवर्गीयांना लागू असलेल्या शिष्यवृत्ती/फ्री शीप योजना, प्रत्येक अभ्यासक्रमाची माहिती, व्यवस्थापन कोटा (असल्यास), अल्पसंख्यांक कोटा, राखीव कोटा, मागील वर्षी कोणत्या टक्केवारीला जागा भरण्यात आल्या इत्यादी माहिती छापण्यात यावी. त्याचप्रमाणे अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जामध्ये अजाती, जमाती, विजाभज ओबीसी, एसबीसी या प्रवर्गासाठी रकान्यांची (Coloumn) तरतूद करण्यात यावी. या सूचनेचे पालन न करणाऱ्या महाविद्यालयांची/संस्थाची माहिती मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य यांना कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कुलसचिवांकरिता

दिनांकः- ११ जुलै,२००५
ठिकाणः- मुंबई

प्रत,

१. प्राचार्य/संचालक कला,वाणिज्य व विज्ञान,विधी,शिक्षण शास्त्र, अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व तत्सम महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था. (अल्पसंख्यांक आणि बिगर अल्पसंख्यांक महाविद्यालये.)
२. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव यांना माहितीसाठी रवाना.
३. संचालक/विभाग प्रमुख विद्यापीठ विभाग आणि प्राचार्य सर.ज.जी वास्तुशास्त्र महाविद्यालय.
४. अध्यक्ष, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ, फोर्ट, मुंबई.
५. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना, विद्यानगरी सांताक्रुझ (प), मुंबई.
६. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, दी रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.
७. अध्यक्ष, महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशन, सी/१, ५०१/५०२, लोकसुरभि, चंद्रमुखी, कल्याण (प), न्यू पत्रीपूल, जिल्हा ठाणे ४२१ ३०१.
८. सचिव, बॉम्बे युनिव्हर्सिटी ॲकॅडेमिक स्टाफ असोसिएशन, विद्यानगरी सांताक्रुझ (पू), मुंबई.
९. मान. अध्यक्ष, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई कॉलेज प्रिंसीपल असोसिएशन, व्ही.जी.वझे कॉलेज, मुलुंड पूर्व, मुंबई
१०. मान. अध्यक्ष असोसिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट कॉलेजेस शंकर सजीव एज्युकेशन सोसायटी, डी.टी.एस.एस कॉलेज ऑफ कॉमर्स, कुरार व्हिलेज, मालाड पूर्व, मुंबई